# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नों.क्र.२२८६/२४/अ.क्र.६०३४/२५/०१**

**श्री. महेंद्र जोगदिया**
ए/२, बिल्डींग, १४ वा मजला,
रुम नं.१४११, नवरंग को. ऑप. हौ. सो.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, तुळशीवाडी,
ताडदेव, मुंबई-४०००३४

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा उपप्रमुख लेखापाल (गृहकर्ज)**
बृहन्मुंबई महानगरपालिका प्रमुख लेखापाल (कोषागार) यांचे कार्यालय,
ई विभाग कार्यालय, तिसरा मजला, १०, शेख हफीजुद्दीन मार्ग,
अग्निशमन दलाच्या मागे, भायखळा (प.), मुंबई-४००००८

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रमुख लेखापाल (कोषागार)**
बृहन्मुंबई महानगरपालिका प्रमुख लेखापाल (कोषागार) यांचे कार्यालय,
ई विभाग कार्यालय, तिसरा मजला, १०, शेख हफीजुद्दीन मार्ग,
अग्निशमन दलाच्या मागे, भायखळा (प.), मुंबई-४००००८

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १४.१०.२०२५**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर द्वितीय अपिलावर आज दि.१४.१०.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपप्रमुख लेखापाल (गृहकर्ज), श्री. गोविंद लक्ष्मण मेमाणे उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रमुख लेखापाल (कोषागार) अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी असे विशद केले की, धारिणी क्र. ९६११, सन १९९८ ते २००० श्री. धारिया हरिष पुंजालाल, संकेतांक क्र. ३६६५९५० ह्यांनी गृहकर्ज घेतलेले असून याबाबत माहिती देण्यात आलेली नाही.

या अपिला संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थी श्री. महेंद्र जोगदिया यांनी दाखल केलेल्या दि.०२.०२.२०२४ रोजीच्या जोडपत्रानुसार धारीनी क्र.९६११ श्री. धारिया हरिष पुंजालाल, संकेतांक क्र.३६६५९५० यांनी गृहकर्ज घेतलेले असून याबाबत त्या सर्व धारीणीच्या छायांकित प्रति तसेच त्यामध्ये जे शपथपत्रे सादर केलेले आहे, त्याच्या प्रती देण्याबाबत अर्ज दाखल केला आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपप्रमुख लेखापाल (गृहकर्ज) यांनी संबंधित त्रयस्थ व्यक्ती श्री. धारिया हरिष पुंजालाल यांना अपिलार्थी श्री. महेंद्र जोगदिया यांनी सादर केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती प्रदान करावी किंवा कसे याबाबत लेखी विचारणा केली असता श्री. धारिया

हरिष पुंजालाल यांनी कार्यालयात सादर केलेल्या अर्जावर त्यांची कोणतीही माहिती कुठल्याही त्रयस्थ व्यक्तीला देण्यात येऊ नये, असे नमूद केले. त्यावर वरील माहिती अपिलार्थींना देण्यास नाकारण्यात आली. त्यावर श्री. महेंद्र जोगदिया यांनी तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रमुख लेखापाल (कोषागार) यांच्याकडे दि.२२.०२.२०२४ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला. त्यावर दि.२९.०२.२०२४ रोजी झालेल्या सुनावणीत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम ८(१)(त्र) नुसार मागितलेली माहिती ही व्यक्तिगत स्वरूपाची असल्यामुळे देता येत नाही, असा निष्कर्ष नोंदविता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपप्रमुख लेखापाल (गृहकर्ज) यांनी घेतलेली भूमिका योग्य असल्याचा निर्वाह दिलेला आहे. त्या विरुद्ध अपिलार्थी यांनी प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दाखल केलेला आहे. यात माहिती देत नसल्याबाबत अपिलार्थी यांनी आक्षेप नोंदविला असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम ७(६) अन्वये विनामूल्य माहिती देण्याची विनंती केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपप्रमुख लेखापाल (गृहकर्ज) यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम ८(१)(त्र) व कलम ११(१) अन्वय तसेच मा.सर्वोच्च न्यायालय यांच्या गिरीश रामचंद्र देशपांडे विरुध्द केंद्रीय माहिती आयोग या प्रकरणातील निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने दिलेल्या दि.१७.१०.२०१४ रोजी निर्गमित केलेले परिपत्रक याचा वापर करून मागितलेली माहिती त्रयस्थ पक्षाची व वैयक्तिक स्वरूपाची माहिती असून ती प्रकट करण्यामध्ये कोणत्याही सार्वजनिक हितसंबंध काही व्यक्तीच्या खाजगीबाबीत हस्तक्षेप करेल, असे व्यक्तिगत तपशीला संबंधाची माहिती असल्याचे आज सुनावणी दरम्यान नमूद केले व उपरोक्त कारणमीमांसा माहिती अधिकार अधिनियम, २००५ यातील तरतुदी व मा.सर्वोच्च न्यायालय यांनी दिलेल्या निर्णयाशी पूर्णतः सुसंगत असून तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपप्रमुख लेखापाल (गृहकर्ज) व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रमुख लेखापाल (कोषागार) यांनी घेतलेल्या निर्णयाकोणत्याही हस्तक्षेप करण्याची आवश्यकता आढळून येत नाही. प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

**वरील अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १४.१०.२०२५**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission
Maharashtra